सोमवार
दि. २१ ऑगस्ट २०२३
मुल्य २ /- रूपये
पृष्ठ ४
वर्ष ६ वे अंक ३४

Postal Reg. No : G2/47/CHA-304/2022-23

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com RNI. MAHMAR/2018/77866 संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

Scan QR code to visit ... Epaper Portal

# उपचाराअभावी परिचारिकेचा मृत्यू

## ■ चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयातील घटना



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत असलेल्या परिचारीकेचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार दि. १८ ऑगस्टला घडली. दोन दिवसाआधीच ती ऑनड्युटी असतांना रुग्णालयातच चक्कर येऊन पडली मात्र तीला वेळीच उपचार मिळाले नसल्याची बाब समोर आल्याने रूग्णालय प्रशासनाविरोधात सर्वत्र रोष व्यक्त होत आहे.
या घटनेमुळे जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील परिचारिका व कर्मचाऱ्यांमध्ये रोष पसरला असून ड्युटीवर तैनात असतानाही प्रकृती ढासळत होती बराच काळ पुरेशा उपचार न मिळाल्याने या परिचारिकेचा मृत्यू झाल्याने संतापाची लाट पसरली आहे. सीमा मेश्राम नावाची ही विवाहित परिचारिका स्थानिक वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात परिचारिका म्हणून कार्यरत होती. दि.१६ ऑगस्ट रोजी प्रसूती वॉर्डमध्ये तिची नाइट ड्युटी होती, ड्युटीवर असताना प्रकृती अस्वास्थ्यामुळे ती खाली पडली. त्यांना तातडीने आपातकालीन कक्षात हलविण्यात आले. मात्र त्यावेळी तेथे एकही डॉक्टर उपलब्ध नव्हता, दुसऱ्या दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंतही त्यांना एकाही डॉक्टरने पाहिले नाही, त्यामुळे त्यांची प्रकृती गंभीर होत असल्याचे पाहून कुटुंबीयांनी त्यांना खासगी डॉक्टरांकडे नेले. प्रकृतीत सुधारणा होत नसल्याचे पाहून अखेर शुक्रवारी त्यांना नागपूरला रेफर करण्यात आले. नागपूरला नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. रुग्णालयातच नोकरीला असतानाही वेळेवर उपचार न मिळाल्याने परिचारिकेचा मृत्यू झाल्याच्या या घटनेने रुग्णालयातील इतर कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यावेळी कर्तव्य बजावणाऱ्या डॉक्टरवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी परिचारिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

## सीमा मेश्राम यांच्या मृत्यू प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई व्हावी

### पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे कार्यरत परिचारिका सीमा मेश्राम यांचा योग्य उपचार न मिळाल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. ही अत्यंत गंभीर बाब असून या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे.
या संदर्भात ना. मुनगंटीवार यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना पत्राद्वारे या घटनेची सखोल चौकशीची मागणी केली आहे. चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत असलेल्या परिचारीका सीमा मेश्राम यांच्या उपचाराला उशीर झाला आणि त्यामुळे त्यांना जीव गमवावा लागला. चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ज्या अधिकारी, डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे हा प्रकार घडला आहे. त्या निष्काळजीपणासाठी दोषींवर तातडीने निलंबन करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ही ना. मुनगंटीवार यांनी केली आहे.
ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत दि. २२ ऑगस्ट रोजी या संदर्भात विस्तृत बैठक चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

## वैद्यकीय अधिकाऱ्यावर कडक कारवाई करा : रितेश तिवारी



चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळाल्याने परिचारिका सीमा मेश्राम यांना आपला जीव गमवावा लागला. शासकीय रुग्णालयात सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळत नाही, हे उघड आहे. मात्र, त्याच रुग्णालयात काम करणाऱ्या नर्सला उपचाराअभावी जीव गमवावा लागतो, ही घटना दुर्दैवी असून, निष्काळजीपणा आहे. या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करून दोषी असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी चंद्रपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष रितेश (रामू) तिवारी यांनी केली आहे. चंद्रपूर जिल्ह्यासह गडचिरोली आणि तेलंगणा राज्यातील ग्रामीण भागातील अनेक गरीब आणि गरजू रुग्ण कमी खर्चात उपचार व्हावे, यासाठी येथे भरती होत असतात. मात्र, येथील रुग्णालयात योग्य उपचार सुविधा मिळत नसल्याचे दिसून येत आहे. सामान्य माणसांना उपचार न मिळणे ही नित्याचीच बाब झाली असताना याच रुग्णालयात कर्तव्यावर असलेल्या परिचारिकेला जीव गमवावा लागला.

## अस्वलीच्या हल्ल्यात विहिरगाव येथील एक शेतकरी गंभीर

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
राजुरा तालुक्यातील विहिरगाव येथील शेतकरी गंगाधर शेंडे (६०) हे जंगलालगतच्या शेतात गेले असता अस्वलिने अचानक हल्ला करून गंभीर जखमी केले.
रुग्णास प्रथम राजुरा उपजिल्हा दवाखान्यात आणण्यात आले परंतु गंभीर जखमी असल्याने चंद्रपूरला हलविण्यात आले आहे. ही घटना दिनांक २० आगष्ट रोजी सकाळी घडली. घटनास्थळ राजुरा वनपरिक्षेत्र अंतर्गत चनाखा नियत क्षेत्रातील कक्ष क्रमांक १६० मध्ये घडली असून माहिती मिळताच वनरक्षक गीता चव्हाण, संजय सुरवसे, वनमजूर लटारू रोहणे जखमीस दवाखान्यात भरती केले. वनविभागाकडून तात्काळ उपचार मदत म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश येलकेवाड यांनी जखमीच्या मुलास ५ हजार रुपयाची आर्थिक मदत दिली आहे पुढील तपास वनकर्मचारी करीत आहे.

## ताडोबा सफारी ऑनलाइन बुकिंगच्या नावाखाली १२ कोटींची फसवणूक

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
ताडोबा जंगल सफारीसाठी ऑनलाइन बुकिंगच्या नावाखाली सरकारची १२ कोटींहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या संदर्भात रामनगर पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध बनावट कागदपत्रे तयार केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. हे दोन्ही आरोपी शहरातील उच्चभ्रू कुटुंबातील आहेत. या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. ताडोबा अंधारी अभयारण्याचे विभागीय वन अधिकारी सचिन उत्तम शिंदे यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे.
प्राप्त माहितीनुसार, ताडोबा जंगल सफारीसाठी चंद्रपूर वाईल्ड कनेक्टिव्हिटी सोल्युशन नावाच्या कंपनीमध्ये ताडोबा अंधारी टायगर प्रोजेक्ट प्रमोशन फाऊंडेशनचे कार्यकारी संचालक यांच्यासोबत करार करण्यात आला. ही कंपनी चंद्रपूर येथील गुरुद्वारा रोड येथील

# वर्तमानपत्रे हे समाजमनाचा आरसा आहे

## : माजी राज्यमंत्री अम्ब्रीशराव आत्राम





सह्याद्रीचा राखणदार विशेषांकाचे प्रकाशन

**गडचिरोली / प्रतिनिधी**
बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरु केले व त्याचे नावही अगदी योग्यच होते. दर्पण म्हणजे आरसा. समाजात सामाजिक, आर्थिक, शासकीय, राजकिय, शैक्षणिक अशा विविध पातळीवर जे घडते त्याचे पडसाद वृत्तपत्रात उमटतात. वर्तमानपत्रे हे समाजमनाचा आरसा आहेत. असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी केले. बुधवार (१६ऑगस्ट) रोजी सह्याद्रीचा राखणदार या मराठी साप्ताहिकाचा ५ वा वर्धापन दिनानिमित्त नागेपल्ली येथील कार्यालयात साप्ताहिक पेपरचा प्रकाशन सोहळा त्यांच्याहस्ते पार पडला. यावेळी ते बोलत होते.
माजी जि.प.अध्यक्ष परशुराम कुत्तरमारे, भाजपचे अहेरी तालुका अध्यक्ष रवी नेलकुद्री यांची प्रमुख उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुकेश नामेवार, नागेपल्ली चे उपसरपंच रमेश शानगोंडावार, प्रशांत नामनवार, ग्रा प सदस्य मल्लारेडी येमनुरवार, किशोर रापेल्लीवार, मोहन खोब्रागडे, सुनतकर, प्रशांत रागीवार, शुभम कुत्तरमारे, विकास तोडसाम आदी मान्यवर उपस्थित होते.
पुढे बोलताना माहिती तंत्रज्ञानाच्या युगात गतीने इतरही प्रसार माध्यमे आलीत. मात्र, वृत्तपत्रांनी आपले अस्तित्व टिकवून आजही दीपस्तंभासारखे दिमाखाने उभे आहे. शहरच नव्हे तर ग्रामीण भागापर्यंत वृत्तपत्राचे जाळे पसरले आहे. शाळा-महाविद्यालयांतुन युवक युवतींचा वाचक वर्ग तयार झाला आहे.
खरंतर वृत्तपत्रे ही समाज व मानव यांना जोडणारा सकारात्मक दुवा आहे. प्रत्येकांच्या गरजा पुरवण्याचे काम वृत्तपत्रे करतात. मग ती नोकरीसाठी रिक्त पदे असो की जागा खरेदी-विक्री असो, नाटक सिनेमा, साहित्य संबधातली माहिती, शासकीय योजना आदी सर्व माहिती समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोचविण्याचे सक्षम माध्यम असून सह्याद्रीचा राखणदारच्या माध्यमातून आपल्या भागातील विविध प्रश्न मांडावे असे आवाहनही त्यांनी केले.

■ माजी जि प अध्यक्ष परशुराम कुत्तरमारे यांनी दिनदुबळयांचा कैवारी वैश्विक माहिती समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोचविण्यचे काम वर्तमानपत्रांतून होते. त्यामुळे समाज प्रगतीत, देशाच्या प्रगतीत मोलाचा वाटा आहे. समस्त जनांचा, गोरगरिबांचा, महिलावर्गांचा, दिनदुबळयांचा कैवारी म्हणून वर्तमानपत्राची जबाबदारी आहे. आणि ती आज निःस्वार्थपणे पार पाडली जात असल्याचे मत त्यांनी व्यक्त केली.

■ सह्याद्रीचा राखणदार या साप्ताहिक अंकाचे माजी राज्यमंत्री अम्ब्रीशराव आत्राम यांच्याहस्ते फित कापून दिमाखदार सोहळयात प्रकाशन करण्यात आले आणि त्यांनतर त्यांनी स्वतः लॅपटॉप हाताळत सह्याद्रीच्या साईट वर जाऊन ई पेपर लिंक उघडुन वाचनही केले. यावेळी त्यांनी अहेरी सारख्या भागात कार्यालय उघडल्याबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिले.

## शेगाव पोलिसांनी पकडला तांदळाची अवैध वाहतूक करणारा ट्रक

**वरोरा / प्रतिनिधी**
पोलिसांना ट्रकद्वारे धान्याची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती प्राप्त होताच पोलिसांनी ट्रकला ताब्यात घेऊन ट्रकमधून होणाऱ्या अवैध तांदळाची वाहतूक करणाऱ्या ट्रकचालक व मालकावर गुन्हा दाखल केला. पोलिसांना गुरुवारी रात्री माहिती मिळाली की, १४ चाकी असलेला ट्रक क्रमांक सीजी ०८ ऐसी ४५०० यामध्ये अवैध सरकारी तांदूळ बाजारात विक्री करता जात असल्याचा संशय असल्याने व पोलिसाला गुप्त माहिती मिळाल्याने पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अविनाश मेश्राम हे आपल्या कर्मचारीसह खातोडा जुना बसस्थानक येथे गोवंश कारवाई करत असताना नाकाबंदी करतांना ट्रक पकडला गेला. त्यांनी वरोरा कडून येणाऱ्या पोलिसांनी ताब्यात घेतलेला ट्रकमध्ये काय आहे असे विचारले असता चालकाने पुन्हा उडवाउडवीचे उत्तर दिले.
पोलिसांनी ट्रकची पाहणी केली असता त्यात तांदूळ असल्याचे दिसून आले. ट्रकचालक, मालकाला बोलवा असे सांगितले.


# प्रतिनिधी पाहिजेत

## सह्याद्रीचा राखणदार

I NEWS PORTAL I PRINT I VIDEO I LIVE I


| II गडचिरोली II | II चंद्रपूर II | II वर्धा II |
|---|---|---|
| ■ शहर प्रतिनिधी, गडचिरोली | ■ शहर प्रतिनिधी, चंद्रपूर | ■ जिल्हा प्रतिनिधी, वर्धा |
| ■ तालुका प्रतिनिधी, आरमोरी | ■ शहर प्रतिनिधी, घुग्घुस | ■ शहर प्रतिनिधी, वर्धा |
| ■ तालुका प्रतिनिधी, धानोरा | ■ तालुका प्रतिनिधी, बल्लारपूर | ■ तालुका प्रतिनिधी, सेलू |
| ■ तालुका प्रतिनिधी, वडसा | ■ तालुका प्रतिनिधी, राजूरा | ■ तालुका प्रतिनिधी, देवळी |
| ■ तालुका प्रतिनिधी, कुरखेडा | ■ तालुका प्रतिनिधी, कोरपना | ■ तालुका प्रतिनिधी, हिंगणघाट |
| ■ तालुका प्रतिनिधी, कोरची | ■ तालुका प्रतिनिधी, पोंभुर्णा | ■ तालुका प्रतिनिधी, समुद्रपूर |
| ■ तालुका प्रतिनिधी, चामोर्शी | ■ तालुका प्रतिनिधी, मूल | ■ तालुका प्रतिनिधी, आर्वी |
| ■ तालुका प्रतिनिधी, सिरोंचा | ■ तालुका प्रतिनिधी, ब्रम्हपुरी | ■ तालुका प्रतिनिधी, आष्टी |
| ■ तालुका प्रतिनिधी, एटापल्ली | ■ शहर प्रतिनिधी, गोंडपिपरी | ■ शहर प्रतिनिधी, कारंजा |
| जिल्हा कार्यालय : रेड्डी कॉम्प्लेक्स, अहेरी रोड, नागेपल्ली जि. गडचिरोली | जिल्हा कार्यालय : साळवे कॉलनी, तुकूम, चंद्रपूर, जि. चंद्रपूर | जिल्हा कार्यालय : व्यंकटेश सहनिवास हाऊसींग सोसा. पहिला माळा नागठाणा रोड, वर्धा, जि. वर्धा |
| महेश गुंडेटीवार, 9325380789 | आशीष घुमे, 9011708840 | प्रशांत अवचट, 9284202940 |
| आनंद दहागावकर, 8999064798 | सुरज घुमे, 9673560360 | राहुल मून, 9359582213 |

■ मुख्य कार्यालय : कल्यानेश्वर हनुमान मंदिर समोर, मातृछाया भवन, कर्मवीर वार्ड, वरोरा जि. चंद्रपूर
■ News Portal : www.sahyandrinews.com ■ Epaper : epaper.sahyandrinews.com
■ Email Id : sahyandrinews.@gmail.com


■■ रेगडी- एटापल्ली मार्गावरील प्रकार, प्रशासनाचे दुर्लक्ष

# देवदा नाल्यावरील पुलाअभावी जीवघेणा प्रवास

**गडचिरोली / आनंद दहागावकर**
चामोशी व एटापल्ली या तालुक्यांना जोडणाऱ्या रेगडी ते देवदा रस्त्यावरील नाल्यावरील पुलाअभावी येथून आवागमन करणाऱ्या शेकडो वाहनधारक व नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. तरीही या पुलाच्या बांधकामाकडे दुर्लक्ष केले जात असल्याने वाहनधारक व नागरिकांना कसरत करत देवदा नाल्यातून ये-जा करावी लागत आहे.
गडचिरोली जिल्हा म्हटलं की, नक्षलवाद, घनदाट जंगल यामुळे प्रत्येकाच्या मनात धडकी भरते. असे असले तरी मात्र, राज्य शासनाच्या नक्षल आत्मसमर्पण या महत्वाकांक्षी धोरणामुळे तसेच गडचिरोली पोलिसांकडून राबविण्यात येणाऱ्या नक्षलविरोधी अभियानामुळे गेल्या दहा वर्षांपासून जिल्ह्यातील नक्षलवाद संपुष्टात येत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. एटापल्ली तालुक्यात जाण्यासाठी कमी अंतराचा मार्ग म्हणून गडचिरोली, चामोर्शी, मुलचेरा व एटापल्ली तालुक्यातील वाहनधारक याच मार्गाचा वापर मोठ्या प्रमाणात करीत आहेत. या रस्त्याचे डांबरीकरण देवदा नाल्यापर्यंत झाले असले तरी हा नाला वाहतुकीसाठी अडसर ठरत आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना देवदा नदीत किरकोळ व मोठ्या अपघातांना सामोरे जावे लागते.
अनेक दुचाकीस्वारांना नुकसानीचा सामना करावा लागत आहे. चामोर्शी, मुलचेरा आणि एटापल्ली तालुक्यासाठी महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या देवदा नाल्यावरील पुलाच्या कामासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होऊनही बांधकाम अर्धवट अवस्थेत असल्याने त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. पावसाळ्याचे दिवस सुरू झाल्याने देवदा नाल्याच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे.



■ वाहतूक सुरू झाल्याने आजही लोकांना जीव मुठीत घेऊन हा नाला पार करावा लागत आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्ह्यातील विविध ठिकाणी भेटी दिल्या. दरम्यान, देवदा नाला ओलांडत असताना दुचाकीस्वार पाण्याच्या प्रवाहात अडकल्याने मोठा अपघात टळला. या दुचाकीमध्ये एक लहान मुलगीही होती, दुचाकीपाण्याच्या प्रवाहात अडकताच संबंधित व्यक्तीने आपल्या मुलीला नाला ओलांडायला लावले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. नाल्यावरील पूल नसल्यामुळे येथील नागरिक सातत्याने अपघाताला बळी पडत आहेत. या कारणास्तव नाल्यावर पूल बांधण्याची नितांत गरजेचे आहे.




# शेतकऱ्यांचा पालनहार (संरक्षक) नागदेवता !





**नागपंचमी हा श्रावण महिन्यातील अत्यंत महत्वाचा सण आहे. यादिवशी घरोघरी नागाची पूजा करून नाग देवतेला प्रसन्न करण्याची पद्धत आहे. नागाच्या मंदिरावर रोषनाई केली जाते, रात्रीपासुन पुजा-अर्चना केली जाते तर कुणाच्या मनसुबाचे निवारण केले जाते. पचमढी येथे नागद्वारला भव्य अशी यात्रा भरवली जाते. जी मध्यप्रदेशच्या नियंत्रणात येते. त्या दिवशी उपासक बाहेरचं साधं पाणी सुध्दा पीत नाही, इतके बारकावे पाळले जातात. उपवास सोडते वेळी कढई केली जाते, जी सर्वांना निमंत्रीतांना दिल्यानंतर उपवास सोडला जातो. इतका जटील उपवास असतो, जो ज्याला जमतो त्यालाच जमतो. सर्वसाधारण माणसं करुच शकत नाही, काटेकोरपणे पालन केले जाते. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्यादिवसा पासून नागपूजा प्रचारात आली असे मानले जाते. दर बारावर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथसंप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या-गौतमी) संगमावर स्नान करतात.**

एका शेतकऱ्याच्या नांगराच्या फाळाने नागिणीची तीन पिल्ले मृत्युमुखी पडली व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशीही समजूत प्रचलित आहे आणि तो वास्तववादी आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगरत नाही. कोणीही खणत नाही, घरी कोणीही भाज्या चिरायच्या नाही, तवा वापरायचा नाही व कुटायचे नाही असे काही नियमाचे पालन करण्याची प्रथा आहे. श्रद्धाळू माणसे नागदेवतेची पूजा करून तिला दूध-लाह्यांचा व गव्हाच्या खिरीचा नैवेद्य दाखवतात व आमचे संरक्षण कर अशी प्रार्थना करतात. अनंत (म्हणजेच शेष), वासुकी, पद्मनाभ, कम्बल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया या ८ नागांची या दिवशी पूजा केली जाते. मात्र खालील श्लोकात वासुकी, तक्षक, कालिय, मणिभद्रक, ऐरावत, धृतराष्ट्र, कार्कोटक आणि धनंजय, असे वेगळेच नाग सांगितले आहेत.

**वासुकिः तक्षकश्चैव कालियो मणि भद्रकः।**

**ऐरावतो धृतराष्ट्रः कार्कोटक धनञ्जयौ?**

भारतीय संस्कृतीत अनेक प्रकारे नागांची पूजा केली जाते. नाग म्हणजे फणाधारी सर्प याच्या फणेवर पुढच्या बाजूने दहाच्या अंका सारखे चिन्ह असते. नागाचा रंग हिरवट किंवा पिवळा असतो. त्याच्या तोंडात विष धारण करणारे दात असतात. नागाची जीभ दुभंगलेली असते. प्राचीन भारतीय लोकांनी त्याला देवत्व देऊन त्याला पूजनीय बनविले. कृषी संस्कृतीत नागाच्या पूजनाचे महत्त्व विशेषआहे. नाग आणि साप हे शेताचे रक्षणकर्ते आणि शेतकरी बांधवांचा मित्र मानला जातो. या सणाच्या निमित्ताने विवाहित बहिणीला तिचा भाऊ माहेरी घेऊन येतो अशी पद्धत भारतात रूढ आहे. नागपंचमीला स्त्रिया व मुली झाडाला दोरे बांधून गाणे म्हणत झोके घेतात. पूजेला जाण्यासाठी हाताला मेंदी लावण्याची पद्धतही हौसेचा भाग म्हणून आलेली दिसते.

पूर्वी नागपंचमीच्या सणापूर्वी ८ ते १० दिवस आधी गल्लीतील सर्व लहान थोर स्त्रिया एकत्र येऊन फेर धरून गाणी म्हणायच्या. झिम्मा-फुगडी, घोडा-चुईफुई, पिंगा-काटवटकाना, पिंगा इत्यादी खेळ मनसोक्त खेळायच्या. खेळता-खेळता उखाणे, गाणी म्हणून मनमोकळं करायच्या. आजही पध्दत ग्रामीण भागात जास्त प्रचलित आहे. त्यामुळे नागपंचमीला जास्त महत्व दिल्या जाते. दहन घाटावरती रात्रभर भजने होत असतात. या दिवशी महिला वर्तुळाकारआकार तयार करून झिम्मा-फुगडी सारखी नृत्ये व खेळ खेळतात. नारळ आणि लिंबू यांच्या या दिवशी शर्थी लावल्या जातात. म्हणजे विशिष्ट अंतरावर नारळे ठेवून त्यांच्या पलिकडे फेकण्याची शर्थ फार जुनी परंपरा आहे.



**प्रविण बागडे, नागपूर - १४**
**मो.९९२३६२०९१९**

यादिवशी महिला घराची स्वच्छता करतात. जमिनी शेणाने सारवितात. अंगणात रांगोळी काढतात. नागाची चित्रे भिंतीवर काढतात आणि त्याची पूजा करतात. काही ठिकाणी नागाच्या वारुळापाशी महिला गाणी म्हणत जातात आणि वारुळाची पूजा करतात. भारताच्या काही प्रांतात नागपंचमीला जिवंत नागाची पूजा होते दूध-लाह्या माणसाच्या आवडीच्या गोष्टी नागांना दिल्या जातात, पण ते त्यांचे अन्न नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. पावसाळ्यात तो माणसाच्या हिताचा आहार आहे. नागाच्या मंदिरात त्या दिवशी बाऱ्या सामुहिकरित्या म्हटल्या जातात. त्यामुळे एखाद्याला दंश झाला की त्या बाऱ्या म्हटल्याने विश सहज उतरते आणि जीव वाचला जातो.

सांगली जिल्हाच्या पश्चिमेला असलेला बत्तीस शिराळा हा तालुका नागपंचमीच्या उत्सवासाठी प्रसिद्ध होते. पुणे-बेंगलोर महामार्गावर कोल्हापूरकडे जाताना, पेठनाका (इस्लामपूर) पासून उजव्या बाजूला एकफाटा फुटतो. तेथून साधारण २० कि.मी वर बत्तीस शिराळा वसलेले आहे. सांगली जिल्हातील हा एकमेव प्रदेश जो निसर्ग समृद्ध आहे. बत्तीस शिराळ्यापासून जवळच चांदोली अभयारण्य, चांदोली धरणआहेत. जेव्हापूर्वी नागपंचमीचा हा उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा तेव्हा नागपंचमीच्या एक महिना अगोदर येथील नागमंडळे नाग पकडायच्या मोहिमेला निघत. हातात लांबकाठी आणि नागाला ठेवण्यासाठी मडके असा लवाजमा घेऊन ५-६ तरुणांचा ग्रुप मोहीम फत्ते करत असे. पकडलेल्या नाग, साप, यांची नागपंचमी उत्सव संपे पर्यंत योग्यप्रकारे काळजी घेतली जाई. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून साधारणपणे १००-१२५ नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जाई. त्यानंतर नागाचे खेळ आयोजित होत. सर्वात उंच फणा काढणारा नाग, सर्वात लांब नाग अशा पकडलेल्या मंडळांना बक्षिसे मिळत. नागपंचमीस नागाचे खेळ पाहण्यासाठी हजारो नागरिक येत. यांतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे २ वर्षाच्या बालकापासून ते म्हाताऱ्या माणसांपर्यंत सर्वजण न घाबरता गळ्यात नाग/धामण घालून फोटो काढत. शिराळ्याची नागपंचमी पूर्वी देशातच नव्हे तर परदेशांत ही प्रसिद्ध होती. नागपंचमीसाठी पूर्वी लाख भर लोक जमायचे. परंतु, सापांचे होणारे हाल पाहून येथील निसर्ग व वन्यजीव प्रेमींनी थेट मुंबई हायकोर्टात धाव घेतली. कोर्टाने वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार २००२ मध्ये आदेश देऊन सापांना पकडणे, त्यांचा खेळकरणे तसेच मिरवणूक काढणे, प्रदर्शन करणे, त्यांच्या स्पर्धा भरवणे यांना बंदी केली. तसेच या आदेशाचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासन, जिल्हाकोर्ट, वन खाते आणि पोलिसांवर सोपविली. त्यामुळे रस्तो रस्ती सापांचे खेळ दाखविणे बंद करण्यात आहे नाहीतर नागपंचमीच्या आठवडयापासुन हे खेळ मोठमोठया शहरात बिनादिक्कत सुरु राहायचे. त्यामुळे काही वर्षांपासून बत्तीस शिराळ्यात फक्त प्रतिकात्मक मिरवणूक काढली जाते. आजचे नागपंचमीचे व्रत नाग प्रदेशातील एका तरी व्यक्तीशी संपर्क निर्माण करून करता येईल. दात काढलेल्या आणि उपाशी ठेवून टोपलीतून आणलेल्या नागांचा छळ थांबविणे. नाग, सापांची उपयुक्तता घरोघरी, शाळा, महाविद्यालये यांच्या मध्ये जाऊन सांगितली पाहिजे. नागांमुळे उंदरांच्या संख्येवर नियंत्रण राहते. हरितक्रांतीची मनीषा पूर्ण व्हायची तर उंदरांच्या पोटात जाणारे धान्य वाचवावे लागेल. प्रत्येक तीन पोत्या पैकी एक पोते उंदीर खातात. म्हणूनच नागपंचमीचे आधुनिक व्रत 'धामण पाळा नी धान्योत्पादन वाढवा' अशा उद्घोषणा बरोबरच ते कृतीतूनही व्हायला हवे. तरारून आलेल्या शेताकडे पाहून कृषी कन्यांना खूप आनंद होतो. मग त्या भविष्याची सुख-स्वप्ने पाहात उंच झोके घेतात व हा सण साजरा करतात. या काळात मुलांनी मैदानी खेळ खेळावे, अशी जुनी प्रथा आहे. त्यासाठी मैदानी खेळांच्या स्पर्धा भरविण्याचा संकल्प श्रावणात धरावा व चातुर्मासात पूर्ण करावा. नागपंथाचा इतिहास आणि त्यासंबंधी विविध कलांची माहिती घेणे. राजस्थान येथे नागपंचमी उत्साहाने साजरी केली जाते. गुजरात प्रांतात ही नागपंचमी साजरी केली जाते. नागपूजनाची परंपरा भारताच्या केरळ, तामिळनाडू या राज्यात ही आढळते. जी आजही अव्याहत सुरु असते. देशात इतरत्र ठिकाणी असलेले नागलोक हा सण दिमाखदार सोहळा म्हणूनही साजरा करतात. प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीत नाग नृत्याचा प्रचार असलेला दिसून येतो. या नृत्याचा संबंध सर्जन शक्तीशी मानला जातो. नागाचा आणि पृथ्वीचा एकमेकांशी असलेला पवित्र संबंध या संस्कृतींनी मान्य केला आहे.

## नागपूर विभागीय उपाध्यक्षपदी कवी ,नीरज आत्राम ,यांची निवड

**वरोरा / प्रतिनिधी**



काव्यप्रेमी शिक्षक मंच ही नोंदणीकृत साहित्य क्षेत्राला वाहिलेली संस्था आहे.महाराष्ट्रातील शिक्षक यांच्यातील सुप्तगुण,व कलेला वाव देण्यासाठी अग्रेसर आहे.नवोदित कवी,लेखकांना प्रोत्साहन देऊन विचारपीठ निर्माण करण्याचा उदात्त हेतू आहे.शिक्षकांमध्ये असलेला कवीमन बाहेर काढण्याचे कार्य काव्यप्रेमी शिक्षक मंचद्वारे केल्या जाते.नुकतेच काव्यप्रेमी शिक्षक मंच नागपूर विभागाच्या उपाध्यक्षपदी कवी,नीरज आत्राम यांची निवड काव्यप्रेमी शिक्षक मंचाचे राज्याध्यक्ष आनंद घोडके, व राज्य सचिव कालिदास चवडेकर यांनी केलेली आहे. कवी, नीरज आत्राम वरोरा जि. चंद्रपूर यांच्या निवडीबद्दल शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक अश्या सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## वर्धा जिल्ह्यात संततधार; धरणातून विसर्ग सुरू



**वर्धा / प्रतिनिधी**

सलग दोन दिवसांपासून पडणाऱ्या पावसाने जिल्ह्यातील पाणी साठ्याची स्थितीच बदलून गेली आहे. काही तालुक्यांत विक्रमी वृष्टी झाली आहे. आजही सकाळपासून पावसाची हजेरी लागल्याने सकाळी सात वाजता लाल नाला प्रकल्पातील जल पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी पाच दरवाजे उघडण्यात आले.

प्रती सेकंद ३२६९ घन फूट इतका विसर्ग नदीपात्रात सोडल्या जात आहे. परिणामी लाल नाला, पोथरा व वर्धा नदीकाठच्या गावांना सतर्क करण्यात आले आहे. काल शनिवारी सायंकाळी निम्न वर्धा धरणाच्या अकरा दारांतून पाण्याचा विसर्ग सुरू झाला. सततच्या पावसाने धरणातील पाण्याची आवक वाढू लागली आहे. इतरत्र कुठेही धोक्याची घंटा अद्याप वाजलेली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.वर्धा तालुक्यातील मदणी येथील धाम नदीवरून पुराचे पाणी वाहत आहे. त्यामुळे रस्ता सद्या वाहतुकीस बंद आहे. वर्धा तालुक्यातीलच करंजी भोगे ते पुजई, पवनी, सोंडलापूर मार्गावर पुरामुळे वाहतूक बंद आहे.

## श्रीक्षेत्र गुरूकुजला तीर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा केव्हा ?

### शासन दरबारी अद्यापही दखल नाही?: गुरूदेव भक्तांमध्ये नाराजीचा सूर

**चिमूर / सुभाष खानोरकर**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गूरूकूज मोझरी हे राष्ट्रीय महामार्गालगत वसलेले तसेच वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची कर्मभूमी अवघ्या महाराष्ट्रात नावलौकिक असणारे तिर्थक्षेत्र आहे.या ठिकाणी दररोज भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होते.गावाच्या विकासाकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासन देखिल शर्थीचे प्रयत्न केले आहे.व नुकताच मंजूर करण्यात आलेल्या मोझरी विकास आराखडया दरम्यान कोटयावधी रुपयांची विकास कामे व डोळयांचे पारणे फिटेल.या पध्दतीचा विकास या क्षेत्रात करण्यात आला आहे. परंतु अनेक वर्षांचा काळ उलटूनही देखील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी असलेल्या गुरूकूज आश्रमास अद्यापही तिर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा प्राप्त न झाल्याने येथील गुरूदेव भक्तांनी यांवर नाराजी व्यक्त केली आहे. संतांची भूमी म्हणून ओळख असलेला जिल्हा म्हणजेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तथा संत गाडगेबाबा असे या अमरावती जिल्हा कडे पाहिले जाते.शिवाय दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात पुण्यतिथीचे मोठ्या उत्साहात महोत्सवात लाखो भाविक उपस्थित राहुन गुरूकुंजाच्या पावन भूमीत महासमाधी स्थळी मौन श्रद्धांजली अर्पण करून नतमस्तक होत असताना .अनेक वर्षांपासून गुरू कुंज आश्रमास तिर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा प्राप्त नसल्याने येथील पाहिजे तसा विकास होत नसल्याने बोलले जात आहे. सन २००७ मध्ये जिल्हा नियोजन समिती अंतर्गत झालेल्या सभेमध्ये गुरू कुंज आश्रमास तिर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा मिळण्यात यावा याकरिता तसा ठराव मंजूर करण्यात आला. परंतु शासन दरबारी सदर काम पुढे रखडल्या ने 'अ' दर्जा प्राप्त नसल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गुरू कुंज आश्रमास आले असताना.त्यांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरू कुंज आश्रमास 'अ' तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात येईल . अशाप्रकारे आश्वासन देण्यात आले.परतु अद्यापही अ.ब.क. अशी कुठलीही क्षेणी गुरू कुंज आश्रमास देण्यात आली नाही.क्रांतिकारी भजनातून तरूणांमध्ये क्रातिची ज्वाला पेटविण्याचा राष्ट्रसंतांच्या आश्रमास तिर्थक्षेत्राचा म्हणून दर्जा केव्हा ? असा प्रशन या निमित्ताने उपस्थित होत आहे.जिलहयातिल छोट्या मोठ्या तिर्थक्षेत्रास 'अ' दर्जा प्राप्त असताना स्थानिक लोकप्रतिनिधी तथा प्रशासन काही करणार का ? असा प्रश्न आता यानिमित्ताने उपस्थित होत आहे.



■ यापूर्वी शासन दरबारी अनेकदा प्रयत्न करण्यात आले.तिर्थक्षेत्र म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरू कूज आश्रमास 'अ' दर्जा प्राप्त नाही.याची खरी खंत असून यासंदर्भात लवकरच बैठक आयोजित करून शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येईल.

**-लक्ष्मणराव गमे, सर्वाधिकारी अखिल भारतीय श्री गुरूदेव सेवा मंडळ.**



■ भारत हा खेड्यांचा देश आहे.हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला.की राष्ट्रांचा विकास होईल.अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती.तुकडोजी महाराजांनी इ.स १९३५ मध्ये मोझरी येथे गुरू कुंज आश्रमाची स्थापना केली.त्यामुळे गुरूदेव आश्रमास शासनाने 'अ' दर्जा प्राप्त करून देण्यात यावी अशी मागणी करीत आहे.

**-महेश तात्याजी गिरडकर सदस्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाराज युवक विचार मंच**

## नागपूरचा उदयोन्मुख कलाकार श्रेयस अतकर

महाराष्ट्राच्या उपराजधानीने चित्रपट व नाट्य सृष्टीला अनेक कलाकार दिले आहेत. यातील काही आजही आपली छाप सोडून आहेत तर काही यशासाठी धडपडत आहेत. या पार्श्वभूमीवर एक प्रयत्नरत, धडपड्या कलाकाराचे नांव समोर येते आणि ते म्हणजे सध्या गाजत असलेल्या व नागपूरची निर्मिती असणाऱ्या 'मायनस थर्टी वन' चित्रपटातील अभिनेता श्रेयस अतकर याचे.








खरेतर बारावी नंतर नेहमीच्या वाटा सोडून आपल्या अंगभूत गुणांना न्याय देणारे क्षेत्र निवडणे आणि त्यादृष्टीने मार्ग निर्धारित करणे थोडे धाडसाचे काम आहे. मात्र याबाबतीत श्रेयसचे नक्कीच कौतुक केले पाहिजे. तसं पाहिलं तर श्रेयसचा मुळ पींड अभिनयाचा. बालपणापासून त्याला नवरंग क्रिएशनच्या नाट्यमेजवानीने या क्षेत्राची गोडी निर्माण केली होती. यातूनच मग श्रेयसने बारावीनंतर नागपूर येथील व्हीएमव्ही महाविद्यालयातून अभिनय, दिग्दर्शन, एडिटींग, नाट्य संहिता लेखनाचे धडे गिरवले. मात्र त्याच्या अभिनय स्वप्नाला आकाश मोकळे करून दिले ते श्रीयुत विरेंद्र गणवीर यांच्या बहुजन रंगभूमीने.

इथे त्याच्या अभिनयाच्या गाडीने वेग पकडला. 'हिटलर की आधी मौत' या नाट्यात त्याने हिटलरच्या बालपणापासून ते मृत्यू पर्यंतचा आलेख उभा केला. यानंतर 'गटार' नाट्य साकारतांना सामाजिक व्यवस्थेतले काळवंडलेले आयुष्य समोर आणले. या दोन नाट्यांनी संपूर्ण विदर्भ गाजवला. राज्य नाट्य स्पर्धेत त्याने भदंत अश्वघोष रंगवतांना वैराग्याची उकल केली. तर तमासगीर नाटकाने त्याला एक वेगळी ओळख निर्माण करून दिली. घायाळ पाखरा या नाटकात तर श्रेयसने मतिमंद मुलाची व त्याच्या वडीलांची अशी दुहेरी भूमिका पार पाडत अभियनयाचा आणखी एक टप्पा गाठला. या सर्व विविधांगी भूमिकांमध्ये श्रेयसची अभिनय कला उठून दिसली. त्याच्या कसदार अभिनयाची सर्वत्र चर्चा होऊ लागली. या कामगिरीबद्दल त्याला राज्य शासनाचा दोनदा बेस्ट ॲक्टर, सिल्व्हर मेडलचा पुरस्कार मिळाला. (यात गोल्ड मेडल नसते). बेस्ट ॲक्टर सर्टिफिकेट तब्बल बारा वेळा मिळाले. लोकांकिका स्पर्धेत तो बेस्ट ॲक्टर ठरला तर लगेचच पुरुषोत्तम करंडकाच्या बेस्ट ॲक्टर पदाचा तो मानकरी ठरला. अभिनया सोबतच श्रेयसने दिग्दर्शनात आपली चुणूक दाखवून थेंब थेंब श्वास या नाट्यासाठी दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक पटकावले.



**अनिल पावशेकर, नागपूर**
**मो.९८२२९३९२८७**

त्याने आपल्या पाच वर्षाच्या छोट्या कारकीर्दीत विविध नाटकांचे एकशे पन्नासहून जास्त प्रयोग महाराष्ट्र भर सादर केले आहेत. या व्यतिरिक्त त्याचे बॉम्बे म्युझिक कंपनीचे अजनबी आणि खुली आंख का सपना हे म्युझिक अल्बम पण बरेच गाजले आहेत.सध्या २०२२ मधे ओटीटी प्लॅटफॉर्म वर 'हाफपेस' हा ॲमॅझॉन प्राईम इंग्लंड व मलेशिया मध्ये प्रदर्शित झाला आहे. 'दी फूल मुन किलर' ही वेबसिरीज, जी तीन भारतीय भाषेत आहे, जेमप्लेक्स ॲपवर सर्वात जास्त पाहिली जात आहे. आत्ताच प्रदर्शित झालेला मायनस थर्टीवन हा चित्रपट व येवू घातलेल्या 'पर्व' या हिंदी चित्रपटात त्याच्या अनोख्या अभिनयाचे प्रेक्षकांना दर्शन होईल.

अशा या गोड, आकर्षक चेहऱ्याच्या, हरहुन्नरी अभिनेत्याला भविष्यात यशस्वी होण्यासाठी खूप खूप शुभेच्छा. सध्या त्याची मुंबई मायानगरीत अभिनयाची घौडदौड सुरू असून त्याला आपण सर्वांकडून आपली साथ व कौतुकाची दाद अपेक्षित आहे. निश्चितच विदर्भाच्या भूमीतला हा अस्सल कलाकार एकदिवस त्याच्या स्वप्नाला गवसणी घालेल यात वाद नाही. तमाम सिनेनाट्य रसिकांतर्फे श्रेयसला पुढील वाटचालीसाठी पुन्हा एकदा भरभरून शुभेच्छा!

# दर्जेदार शैक्षणिक व्यवस्थेसह उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा निर्माण करा : पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

## मनपाच्या आरोग्यवर्धिनी केंद्र व व्हाट्सअॅप चॅटबॉटचे लोकार्पण, डॉ. झाकीर हूसेन उर्दू प्राथमिक शाळेचे नुतनीकरण

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
मानवाचा विकास तसेच समाजाची गुणवत्ता निश्चित करण्यासाठी शिक्षण आणि आरोग्य या दोन बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत जेवढ्या सहजपणे शिक्षण पोहोचेल तेवढ्या गतीने त्या समाजाची प्रगती होते; आरोग्य हा देखील अत्यंत महत्वाचा घटक असून शिक्षण व आरोग्य हे मानवी जिवनातील अविभाज्य घटक आहेत. म्हणूनच जिल्ह्यात दर्जेदार शैक्षणिक व्यवस्थेसह उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा निर्माण करायला हव्या अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.

महानगरपालिकेद्वारा आयोजित आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन व डॉ. झाकीर हुसेन उर्दू प्राथमिक शाळेच्या नूतनीकरण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला महानगर पालिकेचे आयुक्त विपिन पालीवाल, उपायुक्त अशोक गराटे, मंगेश खवले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आविष्कार खंडाळे, मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. वनिता गर्गेलवार, झाकीर हुसेन उर्दू शाळेचे मुख्याध्यापक शहजाद, राहुल पावडे, मंगेश गुलवाडे, सुभाष कासनगोड्डूवार आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.



पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, आझाद गार्डन येथे राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत व्हॅक्युम असेस रोड स्वीपर ही अत्याधुनिक मशीन मनपाच्या माध्यमातून स्वच्छतेसाठी तर शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयोग करण्याच्या दृष्टीने ४९ लक्ष ३५ हजार रुपये खर्च करून फॉगर मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्याचा शुभारंभ करण्यात आला. आरोग्याच्या दृष्टिकोनातून वाढते प्रदूषण, खानपानाची बदललेली व्यवस्था, रासायनिक खतांचा अतिवापरामुळे निर्माण झालेले विषारी अन्न या सर्वांचा सामना करतांना आरोग्य बिघडते. यावर उपाय म्हणून राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय केले आहेत. महाराष्ट्राचे वर्णन चांदा ते बांदा पर्यंत केले जाते तसेच चांदाचे नाव घेतल्याशिवाय महाराष्ट्राचे वर्णन पूर्ण होऊ शकत नाही. चंद्रपूर पुढे गेल्याशिवाय महाराष्ट्र प्रगत राज्य म्हणून मानले जाऊ शकत नाही. त्यासाठी स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने ७०० 'आपला दवाखाना' महाराष्ट्रात सुरू करण्यात आले आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत उत्पन्नाची मर्यादा १ लक्ष ५० हजार होती. ती ५ लक्ष्यापर्यंत वाढविण्यात आली. या योजनेत ५ लाखांमध्ये साधारणतः ९०० पेक्षा जास्त आजारांचे ऑपरेशन पूर्ण केल्या जात असल्याचेही ते म्हणाले. विश्वगौरव प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींनी ५० कोटी लोकांसाठी आयुष्यमान भारत योजना निर्माण केली. भारताची खरी संपत्ती ही योगा आहे. या संपत्तीचा उपयोग नागरीकांनी केल्यास दवाखान्यात जाण्याची गरज भासणार नसल्याचेही ते म्हणाले. पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, भारतीय भूमी ही संस्कारी भूमी आहे. जिल्ह्यात उत्तम दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उत्तम व्यवस्थेसह निर्माण व्हाव्यात यासाठी प्रयत्न केल्या जात आहे.

डॉ. झाकीर हुसेन उर्दू प्राथमिक शाळेच्या माध्यमातून उत्तम विद्यार्थी घडावे, ही सदिच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्ह्यात अपघात तसेच विविध कारणांमुळे दिव्यांग मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे दिव्यागांना मदतीचा हात पुढे केल्यास, समाजाची काळजी एकमेकांच्या मदतीने घेता येईल. मनपा आयुक्त विपिन पालीवाल म्हणाले, शहरातील झोपडपट्टी क्षेत्रात पाहिजे त्याप्रमाणात आरोग्य सुविधा नव्हत्या, याकरीता शासनाने महानगरपालिकेला १२ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केली. त्यापैकी मागील १ मे रोजी १० आरोग्यवर्धिनी केंद्राचे लोकार्पण करून जनतेच्या सेवेत रुजू करण्यात आले.

■ व्हाट्सअॅप चॅटबॉट प्रणालीचे लोकार्पणः चॅटबॉटच्या माध्यमातून मनपाच्या विविध योजनांची माहिती घेता येईल, ८५३०००६०६३ या क्रमाकांवर हाय मॅसेज केल्यास मनपा अंतर्गत असणाऱ्या विविध योजनांची माहिती मोबाईलवर प्राप्त होणार आहे. अशा तंत्रज्ञानाचा वापर करून जिल्हा विकासाच्या क्षेत्रात पुढे न्यावा, असे पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले. दिव्यांग धोरणातंर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना धनादेश वितरणः चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या दिव्यांग धोरण अंतर्गत दिव्यांक लाभार्थ्यांना टक्केवारीनुसार निधी देण्यात येतो यामध्ये १४२ लाभार्थ्यांना १२ लक्ष ९४ हजार रुपये निधीचे वितरण करण्यात आले.

# विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याची थाटात सांगता

**मारेगाव / प्रतिनिधी**
जनहित कल्याण संघटना मारेगाव क्रांती युवा संघटना वणी व पुरोगामी पत्रकार संघटना मारेगाव, यांच्या संयुक्त विद्यामाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्य १५ ऑगष्ट रोजी स्थानिक शेतकरी सुविधा केंद्रात विध्यार्थी गुणगौरव सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते

यावेळी कार्यक्रमाचे ख्यातानाम लेखक, पीएच. डी.प्रबंधाचे मुद्रित शोधन करणारे व पत्रकारितेचा प्रदीर्घ अनुभव असलेले दीपक रंगारी यांनी मराठी भाषेचे लेखन व वाचन यावर प्रकाश टाकला. मराठी भाषेचे वाचन व व्याकरणात होणाऱ्या चुका या विषयावर त्यांनी विदयार्थी गुणगौरव सोहळयात विद्यार्थ्यचा क्लास घेतला. कार्यक्रमाच्या मार्गदर्शिका सुनयना येवतकर यांनी आपल्या भाषणातून महिलांच्या सबलिकरणावर यथोचित मार्गदर्शन केले शेकडो वर्षांपासून महिलांबाबत सुरु असलेल्या रूढी परंपरांना फाटा देऊन आजच्या स्त्रीला समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करण्याची गरज असल्याची बाबा त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली.



या गुणगौरव सोहळयांच्या अध्यक्ष स्थानी पुसद अर्बन बँकेचे उपाध्यक्ष तथा क्रांती युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राकेश खुराणा होते. 'विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून जिद्द व चिकाटीची कास धरल्यास यशो शिखर गाठने शक्य आहे. असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणातून केले

उदघाटक मारेगाव नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ मनिष मस्की तर मार्गदर्शिका महिला जिल्हाध्यक्षा महात्मा जोतिबा फुले समता परिषद यवतमाळ सुनयना येवतकर, प्रमुख अतिथी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गौरीशंकर खुराणा, मारेगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार जनार्दन खंडेराव, माजी प्राचार्य भास्करराव धानफुले बाजार समितीचे संचालक यादवराव काळे, खडसे, विखणकर, सरपंच रविराज चंदनखेडे जनहित कल्याण संघटना मारेगावचे अध्यक्ष समीर कुडमेथे, उपाध्यक्ष रॉयल सय्यद, महिला अध्यक्ष कविता मडावी, सचिव सुवर्णा खामणकर, रवी पोटे, सागर लोणारे, तुळशीराम कुमरे, अंकुश माफूर, आकाश बदकी उपस्थित होते.

■ कार्यक्रमाचे संचालन भास्कर राऊत यांनी केले. प्रास्ताविक सुमित गेडाम तर आभार सुरेश नाखले यांनी मानले विद्यार्थी गुणगौरव सोहळयास पालक व विध्यार्थी बहुसंख्येनं उपस्थित होते यावेळी प्रत्येक शाळा व महाविद्यालयातून प्रथम येणाऱ्या तालुक्यातील ४३ विद्यार्थ्यांचा मोमेनटो व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कर्यक्रमाच्या यशस्वीकरिता पुरोगामी पत्रकार संघांचे मोरेश्वर ठाकरे, सुमित हेपट, गजानन आसूटकर, धनराज खंडरे, गजानन देवालकर, सुरेश पाचभाई, आनंद नक्षीने, भैया कनाके, शरद खापणे याचे सहकार्य लाभले.

# खुल्या निबंध स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**वरोरा / प्रतिनिधी**
राज वारसा प्रोडक्शन निर्मित मराठी चित्रपट सुभेदार दिनांक २५ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे. त्याचे औचित्य साधून २० ऑगस्ट रोजी ही निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. वरोरा येथील उद्योजक अनिल नारायणराव वरखडे हे या चित्रपटाचे निर्माते आहे. येथील हिरालाल लोया विद्यालयाच्या सभागृहात या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

वीर सुभेदार तान्हाजी मालुसरे आणि सिंहगड युद्ध या विषयावर आयोजित निबंध स्पर्धा २० ऑगस्ट रोजी शिवशंभो बहुउद्देशिय सामाजिक संस्था वरोरा, शंभूराजे मर्दानी खेळ मंच, पुणे आणि विवेकानंद फाऊंडेशन वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## राजवारसा प्राँडक्शन चे आयोजन



करण्यात आली होती. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असल्याने या स्पर्धेत विद्यालय आणि महाविद्यालयातील ९५ स्पर्धक सहभागी झाले होते. निबंध स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. सुभेदार तानाजी मालुसरे यांच्या विषयावर लिहताना मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. या स्पर्धेतील विजेत्यांना शिवचरित्र ग्रंथ आणि सुभेदार चित्रपटाचे ४ तिकीट व सर्व सहभागी स्पर्धकांना 'सुभेदार' चित्रपटाचे एक टिकीट आणि प्रमाणपत्र देण्यात येईल अशी घोषणा 'सुभेदार' चित्रपटाचे निर्माते अनिल नारायण वरखडे यांनी केली. तसेच स्पर्धेचा निकाल हा २५ आँगष्टला 'सुभेदार' चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या दिवशी सोशल मिडीयावर जाहीर करण्यात येणार आहे.

# कॅबिनेट मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचा एक फोन अन मॉडेल स्कुलला मिळाले तीन शिक्षक

## श्रीनिवास विरगोनवार यांच्या प्रयत्नांना यश

**अहेरी / प्रतिनिधी**
येथील मॉडेल स्कुल मध्ये शिक्षकांची अनेक पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची माहिती कॅबिनेट मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांना कळताच त्यांनी संबंधित विभागाला एक फोन कॉल केला अन् येथील मॉडेल स्कुल ला नुकतेच तीन शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे पालकांनी कॅबिनेट मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचे आभार मानले आहे.



मॉडेल स्कुल मध्ये ६ वी ते १० पर्यंत शेकडो विद्यार्थी शिक्षण घेतात. दरवर्षी इयत्ता ५ व्या वर्गाची प्रवेश परीक्षा पास करून याठिकाणी प्रवेश घेतात. विविध तुकड्यात जवळपास २०० विध्यार्थी शिक्षण घेतात. त्यात मुलींची संख्या अधिक आहे. एकूण ५ तुकड्या करिता मुख्याध्यापक वगळता ४ शिक्षक कार्यरत होते. त्यापैकी केवळ एकच महिला शिक्षक होते. ही बाब राष्ट्रवादी काँग्रेसचे अहेरी तालुका अध्यक्ष श्रीनिवास विरगोनवार यांनी निवेदनाच्या माध्यमातून कॅबिनेट मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांना निदर्शनास आणून दिली.

■ त्यांनतर क्षणाचाही वाट न बघता कॅबिनेट मंत्री धर्मराव बाबा यांनी संबंधित विभागाला निर्देश देऊन त्वरित शिक्षकांची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले. विशेष म्हणजे त्यावेळी धर्मराव बाबा आत्राम हे कॅबिनेट मंत्रिपदाची शपथही घेतली नव्हती. मात्र, आमदार या नात्याने त्यांच्या शब्दाचे मान ठेवून आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी येथे तीन शिक्षकांचे संयोजन करण्यात आले. त्यात निलेश विश्रोजवार, मनोज झाडे, कु गीता वैरागडे यांचा समावेश आहे.

## नॅशनल हायवे लगत पडलेले भगदाड होणार बंद

**चिमुर / प्रतिनिधी**
भिसी चौरस्ता येथे नॅशनल हायवे अँपरोज रस्त्यालगत भोगदाळ पडले. सदर कामाची जबाबदारी नॅशनल हायवे ३५३ ई च्या एस .एम . एस . कंपणीने स्विकारली असून काम सुरु केले परंतू पावसामुळे विलंब होत आहे.

सदर भगदाड पडलेल्या ठिकाणी डिस्टीबुट करण्यासाठी पाईप टाकण्यात आला आहे. सदर पाणी पास होण्यासाठी नाली काढावी लागते. परंतू त्यावेळी अस्तित्वात असणाऱ्या ग्रामपंचायतने अथवा आता अस्तित्वात असणाऱ्या नगरपंचायतने अतिक्रमण काढु न दिल्याने या ठिकाणी पाणी मुरत असून ते भगदाड पडल्याचे कंपणीकडून सांगण्यात आले.

# आठ दुचाकी चोरट्यास अटक




**चंद्रपूर / प्रतिनिधी**
पोलीस स्टेशन सावली येथे १७ऑगस्टला कलम ३७९ भा द वी अन्वये मोटरसायकल चोरीचा गुन्हा नोंद आहे. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे संशयित आरोपी करण महेश चेरकुरवर वय १९ वर्ष रा. इंदाळा, जि. गडचिरोली याला ताब्यात घेऊन कसून विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. सदर आरोपी व त्याचा विधिसंघर्शित साथीदार रा गडचिरोली असे मिळून गडचिरोली व सावली परिसरात मोटरसायकल चोरी करतात. अद्याप नमूद आरोपी , त्याचा साथीदार यांचेकडून व यांनी ज्यांना मोटरसायकल विकल्या त्यांचेकडून एकूण ८ मोटरसायकल जप्ती केल्या असून अजून काही मोटरसायकल मिळण्याची होण्याची शक्यता आहे. सदरची कारवाई मा पोलिस अधीक्षक रवींद्र सिंग परदेशी, अप्पर पोलिस अधीक्षक रिना जनबंधू , उपविभागीय पोलिस अधिकारी मल्लिकार्जुन इंगळे यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार आशिष बोरकर यांचे नेतृत्वात पोलिस हवालदार दिलीप मोहूरले, संजय शुक्ला , पोलिस नाईक मोहन दासरवर, धीरज पिदुरकर, विजय कोटणाके, चंद्रशेखर गंपलवार यांनी केली.

**मागील एक वर्षांपासून निरंतर सुरू आहे 'राष्ट्रगीत', भर पावसात सर्वजण एकत्र येत साजरा केला वर्धापन दिन**

# मुलचेरातील 'राष्ट्रगीत' गायन उपक्रमाला एक वर्षे पूर्ण

**गडचिरोली / महेश गुंडेटीवार**
मुलचेरा येथील ठाणेदार अशोक भापकर यांच्या संकल्पनेतुन मुलचेरा तालुका मुख्यालयात दररोज सकाळी ८ वाजून ४५ मिनिटांनी राष्ट्रगीत म्हटले जात आहे. त्यानंतरच येथे कामाचा श्रीगणेशा होतो. महाराष्ट्रातील भिलवडी येथेही हा उपक्रम सुरू असून मुलचेरा हे राज्यातील दुसरे गाव आहे. तर जिल्ह्यातील पहिलं गाव आहे, जिथे दररोज राष्ट्रगीत म्हटले जाते. या उपक्रमाला १५ ऑगस्ट रोजी एक वर्ष पूर्ण झाले असून १८ ऑगस्ट रोजी मुलचेरा तालुका मुख्यालयात सर्व अधिकारी, कर्मचारी आणि विविध शाळेतील विध्यार्थी मोठ्या संख्येने एकत्र येत सामूहिक राष्ट्रगीत म्हणत वर्धापनदिन साजरा केला.



लहानपणी शाळा सुरू होण्यापूर्वी प्रार्थनेच्या वेळी राष्ट्रगीतासाठी उभे राहून ते संपल्यानंतर भारत माता की जय म्हणतांना जो राष्ट्र अभिमान वाटायचा त्याला कशाशीच तोड नव्हती. राष्ट्रगीताची ती वेळ संपूर्ण वातावरण भरून टाकण्यासाठी पुरेशी असायची. आता मात्र तो अनुभव सहसा घेता येत नाही. मात्र मागील एक वर्षापासून मुलचेरा तालुका मुख्यालयात सकाळच्या सुमारास हा अनुभव सर्वांनाच घेता येत आहे. सकाळी ८ वाजून ४५ मिनिट अगोदर काही सेकंद देशभक्तीपर गाणं वाजतो. त्यानंतर 'परेड सावधान' झालं की 'राष्ट्रगीत सुरू कर' अशी सूचना येते आणि हा आवाज मुलचेरा मध्ये जिथपर्यंत पोहोचतो तेथील गावकरी सावधान स्थितीत उभे राहून राष्ट्रगान सुरू करतात. यावेळी आजूबाजूच्या लहान मोठ्या वाहनांना देखील आपसूक ब्रेक लागुन चालक सुद्धा उत्स्फूर्तपणे यात सहभाग घेतात. राष्ट्रगीत संपलं की सगळे भारत माता की जय' असा एकच जयघोष करतात आणि त्यानंतर देशाप्रती भावना व्यक्त करून आपल्या दिवसाची सुरुवात करतात. दुकानदार आपले दुकान उघडतात आणि बाजारपेठा सुरू होतात. १५ ऑगस्ट २०२३ ला या अभिनव उपक्रमाला तब्बल एक वर्ष पूर्ण झाले असून स्वातंत्र्य दिनी भरगच्च कार्यक्रम १६ ऑगस्ट रोजी पतेती निमित्त शाळांना सार्वजनिक सुट्टी असल्याने १७ ऑगस्ट रोजी नियोजन करून १८ ऑगस्ट रोजी मुख्य चौकात सर्वांनी एकत्र येत सामूहिक राष्ट्रगीत म्हणत मोठ्या जल्लोषात पहिला वर्धापन दिन साजरा केला. विशेष म्हणजे भर पावसातही सर्वांनी ५२ सेकंद तटस्थ सावधान मध्ये उभे राहून देशाप्रती भावना व्यक्त केले.

■ सहा. पोलीस निरीक्षक अशोक भापकर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला हा उपक्रम मागील वर्षांपासून निरंतर सुरू असून ही अभिमानाची बाब आहे. यापुढेही असंच निरंतर हा उपक्रम सुरू राहावं यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावे. अश्या अनोखा उपक्रम माझ्या तालुक्यात सुरू असून महाराष्ट्रातील दुसरे आणि गडचिरोली जिल्ह्यातील मुलचेरा हा पहिलं गाव आहे. याचा मला अभिमान आहे.
**-चेतन पाटील, तहसीलदार मुलचेरा**

■ मागील वर्षी सुरू झालेल्या या उपक्रमाला व्यापारी वर्ग, अधिकारी, विद्यार्थी विशेष म्हणजे पत्रकार बांधव या सर्वांचा सहकार्य मिळालं. ठरलेल्या वेळेत सर्वजण राष्ट्रगीत साठी सावधान उभे राहून राष्ट्रगीत होताच दिवसाची सुरुवात करतात. यामुळे देशभक्ती आणि समजतही एकोपा वाढला आहे. या ठिकाणी मी असो किंवा नसो मात्र, हा उपक्रम असेच निरंतर सुरू राहावे हीच माझी इच्छा आहे.
**-अशोक भापकर, ठाणेदार मुलचेरा**

# कत्तलखान्यात जाणाऱ्या चोवीस गुरांची केली सुटका

## वाहनात कोंबून जाणारे तीन गोवंशाचा झाला मृत्यू




**चंद्रपूर / प्रतिनिधी**
पोलिस स्टेशन पोंभूर्णा हद्दीतील चिंतलधाबा- केमारा रोडवरून गोवंश तस्करी होणार असल्याची गुप्त माहितीच्या आधारे चिंतलधाबा-केमारा रोडवर नाकाबंदी लावण्यात आली दरम्यान अवैध गोवंश वाहतूक करणारे तीन पिक-अप ताब्यात घेतले.

मात्र या दरम्यान काही अंतरावर जाऊन थांबलेले पिक-अप चालक पळून जाण्यात यशस्वी झाले. तीन पिक-अप मध्ये एकूण २७ नग गोवंश जनावरे अवैधरित्या बेकायदेशीर वाहतूक करतांना सापडले. यात कोंबून नेत असलेले तीन गोवंश मृत्यू झाले होते. त्यांचेकडून २७ गोवंश जनावरे, तीन पिक-अप गाड्या असा एकूण २६ लक्ष ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी गोवंश करणारे आरोपी जंगलाचा फायदा घेत पळून गेले. त्यांचे विरुध्द भादवी कलम ४२९, ३४, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम ५ (१)अ, ५ ब, प्राणी छळ प्रतिबंध अधिनियम कायदा ११ (१)(ड), अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही ठाणेदार मनोज गदादे, पोलिस हवालदार वासुदेव आत्राम, पोलिस अंमलदार राजकुमार चौधरी, अविनाश झाडे, अरविंद चुधरी यांनी केली असून पुढील तपास हवालदार वासुदेव आत्राम करीत आहेत.

## संस्थापक संपादकांचा जन्मदिवसही साजरा










# आनंदवनात साजरा झाला सह्याद्रीचा ५ वा वर्धापन दिन



### अंकुश आगलावे

लोकशाहीत चार स्तंभ महत्त्वाचे असतात या चारही स्तंभांच्या भूमिका वेगवेगळ्या असल्या तरी लोकशाहीतील चौथा स्तंभ म्हणजे वर्तमानपत्राचे मौलिक योगदान आहे समाजातील सर्वसामान्य माणसांच्या व्यथा आणि वेदना समाजासमोर मांडण्याचे काम वर्तमानपत्रे करीत असतात सह्याद्रीचा राखणदार आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावत आहे याच भरोशावर ते विदर्भ नव्हे तर महाराष्ट्रात पोहोचेल असे विचार त्यांनी व्यक्त केले आपल्या पत्रकारांच्या माध्यमातून अन्यायाला वाचा फोडण्यासाठी राखणदार समर्थ आहे हे प्रतिबंध त्यांनी केले. आपल्या बातम्या आणि लेखांच्या माध्यमातून हे वर्तमानपत्र वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्वप्नातील चांगला समाज घडविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**वरोरा / प्रतिनिधी**

कठोर परिश्रम आणि कष्ट करण्याची जिद्द या जोरावर घुमे बंधूंनी सह्याद्रीचा राखणदार या वर्तमानपत्राला सर्वोत्तम बनवलेले आहे.अतिशय आकर्षक छपाई व प्रबोधनात्मक लेखन यामुळे सह्याद्रीचा राखणदार खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचा झाला आहे.त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. राखणदार हे पत्रकारितेच्या क्षेत्रातील मैलाचा दगड ठरले असून अजूनही या वर्तमानपत्राची उत्तरोत्तर प्रगती होऊन हे वर्तमानपत्र नावारूपाला यावे असे विचार महारोगी सेवा समितीचे विश्वस्त सुधाकर कडू यांनी व्यक्त केले. ते आनंदवनात सह्याद्रीचा राखणदार या वृत्तपत्राच्या पाचव्या वर्धापन दिन आणि संस्थापक संपादक मारोतराव घुमे यांच्या ७३ व्या वाढदिवसाच्या निमित्त

### मारोतराव घुमे

माझ्या लहानपणी माझे वडील गावातून शहरात येत असताना गरजू लोकांसाठी त्यांनी सांगितलेल्या वस्तू शहरातून आणून देण्याचे काम करायचे. तोच वसा मी माझ्या वडिलांपासून शिकलो. पुढे कायम ठेवला. माझ्या वडिलांनी सांगितले की, गरजूंची सेवा केली तर पुण्य मिळते. ते मिळण्यासाठी मी सतत प्रयत्नशील राहिलो. त्यातूनच हे वृत्तपत्राचे काम सुरू केले आणि माझ्या दोन्ही मुलांनी ते यशस्वीपणे पुढे नेले याचा मला अभिमान आहे.

### डॉ.यशवंत घुमे

अलीकडे वाढत्या महागाईत साप्ताहिक चालविणे हे आर्थिकदृष्ट्या कठीण काम आहे. परंतु अनेक अडचणींवर मात करीत सह्याद्रीचा राखणदार पाच वर्षाचा झाला ही अतिशय आनंदाची बाब आहे. यापुढेही त्याची भरारी कायम राहील असा आत्मविश्वास व्यक्त करीत त्यांनी सांगितले की ,अलीकडील वाढत्या सोशल मीडियाच्या प्रभावात वर्तमानपत्रांचे काम आणि जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहे. कुठलीही घटना घडल्यानंतर एका मिनिटात ती जगभर पसरत असते. अशा काळात साप्ताहिकांना काम करताना मोठे कौशल्य लागत . वर्तमानपत्राच्या क्षेत्रात धनाढ्य शक्ती कार्यरत असताना साप्ताहिक चालविणे सोपे काम नाही. परंतु आमचे जाहिरातदार, वर्गणीदार, शुभचिंतक, बातमीदार, लेखक यांच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले .यापुढेही ते कायम राहील असा विश्वास व्यक्त केला. सह्याद्रीचा राखणदारचा पाचवा वर्धापन दिवस आणि आमचे संस्थापक संपादक मारोतराव घुमे यांचा वाढदिवस हा दुग्धशर्करा योग आमच्यासाठी आनंददायी अनुभव आहे.

आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून महारोगी सेवा समिती वरोरा चे विश्वस्त शकील पटेल ,वरोरा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष विलास टिपले, माजी नगराध्यक्ष गजानन मेश्राम, सीडीसीसी बॅंक चंद्रपूर चे माजी संचालक तथा सहकार बोर्ड चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष वसंत विधाते ,कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते देविदास कष्टी ,ग्रामगीता प्रचारक डॉ. अंकुश आगलावे ,शिवसेना ( उ.बा.ठा) जिल्हा प्रमुख मुकेश जिवतोडे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी त्यांनी श्रध्देय बाबा आमटे आणि वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे वेगवेगळे नव्हतेच. त्यांच्यात वैचारिक साम्य होते. त्यामुळे दोघात छान समीकरण जुळत होते. दोघांनीही आपापल्या परीने मानव सेवा केली. तुकडोजी महाराज आनंदवनात यायचे. समाजसेवेच्या इतिहासात दोघेही आपापल्या परीने तुल्यबळ होते असेही विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सह्याद्रीचा राखणदारचे वरिष्ठ संपादक डॉ. यशवंत घुमे,संचालन अशोक टिपले,आभार व्यवस्थापक संपादक आशीष घुमे यांनी केले. यावेळी आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य सुहास पोतदार, संधि निकेतनचे अधिक्षक रविंद्र नलगिंटवार, अंबाजोगाई येथून आलेले जेष्ठ साहित्यिक तथा आनंदवनचे शुभचिंतक दगडू लोमटे, सेंद्रिय शेती विभाग प्रमुख ऋषिकेश मोरे, शिवसेनेचे बंडु डाखरे, किशोर मांडवकर, सुजीत वाटकर, गोपाळ गुडधे, पत्रकार प्रशांत खुळे, पत्रकार प्रवीण खिरटकर , पत्रकार लखन केशवानी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्वरानंदवनचे व्यवस्थापक सदाशिव ताजने आणि महरोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे यांचे स्वीय सहाय्यक राजेश ताजणे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचा वाटा उचलला.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यकारी संपादक सुरज घुमे , रमेश वाटकर , स्वरानंदनवन येथील कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.




## स्वातंत्र्य दिनी वरोरा -भद्रावती विधानसभा क्षेत्रात ऐतिहासिक क्षणाची नोंद

# माजी सैनिक व विरपत्नी यांचा शिवसेना ( उ. बा. ठा. ) पक्ष प्रवेश



**वरोरा/ प्रतिनिधी**

दि. १५ ऑगस्ट रोज मंगळवार ला स्वातंत्र्यदिनी माजी सैनिक व विरपत्नी यांनी शिवबंधन बांधीत शिवसेनेच्या 'शिवालय' ह्या मध्यवर्ती कार्यालयात शिवसेना ( उ. बा. ठा. ) पक्षात प्रवेश केला. स्वातंत्र्यदिनाच्या शुभ पर्वावर संपूर्ण महाराष्ट्रात या ऐतिहासिक क्षणाची नोंद वरोरा - भद्रावती विधानसभा क्षेत्रात झाली.

याप्रसंगी देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शुर विरांच्या विर पत्नी आणि माजी सैनिक यांना अत्यंत सन्मानपूर्वक शिवबंधन बांधीत त्यांचा पक्षप्रवेश सभारंभ पार पडला. याप्रसंगी पार पडलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना ( उ. बा. ठा. ) वरोरा -भद्रावती विधानसभा क्षेत्र प्रमुख रविंद्र शिंदे यांच्यासह शिवसेना जिल्हा महिला संघटिका तथा राणी लक्ष्मीबाई महिला रक्षणदल जिल्हाप्रमुख नर्मदा बोरेकर, जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुषमा शिंदे, युवा सेनापुर्व विदर्भ सचिव प्रा. निलेश बेलखेडे, उपजिल्हाप्रमुख भास्कर ताजने, भद्रावती तालुका प्रमुख नरेंद्र पढाल, वरोरा तालुका प्रमुख दत्ता बोरेकर व वरोरा शहर प्रमुख वर्षा कुरेकर प्रामुख्याने हजर होत्या.

या ऐतिहासिक क्षणी कारगील योद्धा तथा जयहिंद फाऊंडेशनचे सल्लागार कॅप्टन विलास देठे, जेष्ठ माजी सैनिक तथा तीन युध्दात सक्रीय सहभाग घेतलेले रामचंद्र नवराते, जयहिंद फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष तथा माजी उपसरपंच विजल तेलरांधे, माजी सैनिक कारगील योध्दा रुपेश कुत्तरमारे, माजी सैनिक अरुण खापने, माजी सैनिक नामदेव मांडवकर, माजी सैनिक कारगील योध्दा अजीत राम, माजी सैनिक प्रमोद गावंडे, माजी सैनिक संजय बेलेकर, माजी सैनिक अरुण मत्ते, माजी सैनिक कारगील योध्दा सुरेश नाकाडे , माजी सैनिक रमेश सातेकर , माजी सैनिक मारोती जांभुळे, माजी सैनिक दिलीप गंग्रस, माजी सैनिक बीएसएफ अनिल जिवतोडे, माजी सैनिक कारगील योध्दा राकेश फूले, माजी सैनिक नमोद रामटेके, माजी सैनिक कारगील योध्दा भाऊराव मत्ते आणि माजी सैनिक श्रीराम कुलकर्णी यांच्यासह माजी सैनिक पत्नी द्वारका नवराते, विरपत्नी सुर्या विश्वास सावसाकडे, विरपत्नी रंजना प्रकाश घटे, विरपत्नी कमल सुरेश मत्ते ,विरपत्नी विजया अब्रहम सम्युअल, माजी सैनिक पत्नी मनिषा राकेश फूले, माजी सैनिक कन्या पुजा तिरमलवार आणि माजी सैनिक पत्नी तथा जयहिंद फाऊंडेशनच्या सहसचिव दर्शना तेलरांधे यांनी शिवसेना ( उ. बा. ठा. ) पक्षात प्रवेश केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना जिल्हा महिला संघटिका तथा राणी लक्ष्मीबाई महिला रक्षणदल जिल्हाप्रमुख नर्मदा बोरेकर यांनी केले. याप्रसंगी युवा सेनापुर्व विदर्भ सचिव प्रा. निलेश बेलखेडे आणि वरोरा शहर प्रमुख वर्षा कुरेकर यांनी समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भद्रावती तालुका प्रमुख नरेंद्र पढाल व आभार प्रदर्शन भद्रावती शहर घनश्याम आस्वले यांनी केले.

### माजी सैनिक व विरपत्नी यांना पक्षात योग्य सन्मान मिळेल : रविंद्र शिंदे



पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या मार्गदर्शनात देशासाठी अविरत कार्य केलेल्या माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबातील विरपत्नी यांना पक्षात योग्य सन्मान मिळेल . आता ही सर्व मंडळी शिवसेना ( उ. बा. ठा. ) पक्षाचे घटक झाले आहे.त्यांच्या अनुभावाचा पक्षाला निश्चीतच लाभ होईल. त्यांच्या समस्या, मागण्या व अडचणी मार्गी लावून त्यांना योग्य न्याय मिळविण्यासाठी आम्ही सदैव प्रामाणिक प्रयत्न करू. अवघ्या महाराष्ट्रात वरोरा -भद्रावती विधानसभा क्षेत्रात मोठ्या संख्येत माजी सैनिक व विरपत्नी यांचा शिवसेना ( उ. बा. ठा. ) मधील पक्ष प्रवेश निश्चीतच शिवसेना परीवारासाठी भूषणावह आहे. असे प्रतिपादन शिवसेना ( उ. बा. ठा. ) वरोरा -भद्रावती विधानसभा क्षेत्र प्रमुख रविंद्र शिंदे यांनी या प्रसंगी केले.

# भाजपा ग्रामीण, शहर व गुरूदेव मंडळा तर्फे बावनकुळे यांचा ग्रामगीता देवून सत्कार



**भद्रावती / प्रतिनिधी**

भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, तथा विधान परिषद सदस्य चंद्रशेखर बावनकुळे यांचे चंद्रपूर व यवतमाळ जिल्हा दौरा कार्यक्रम दरम्यान विविध आघाडी, भाजपा पदाधिकारीं, ज्येष्ठ नागरीक, प्रतिष्ठित व्यक्ती, संपर्क से समर्थन अभियान ,पक्ष प्रवेश अशा अनेक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. यावेळी डॉ. अंकुश आगलावे , भाजपा जिल्हा महामंत्री ओबीसी वरोरा तथा गुरूदेव सेवा मंडळाचे प्रचारक तथा भाजपा ग्रामीण व शहर पदाधिकारी यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांचा शाल श्रीफळ व ग्रामगीता देवून भद्रावती नगरीत सत्कार केला.

याप्रसंगी भाजपाचे पदाधिकारी रमेश राजुरकर , डॉ. भगवान गायकवाड, एहतेशाम अली, बाबा भागाडे, नरेंद्र जीवतोडे, आकाश भागाडे, प्रविण सातपुते, प्रशांत डाखरे, ॲड. सुनिल नामोजवार, गोपाल गोसावडे, संजय झाडे, अमित गुंडावार, तुळशीराम श्रीरामे, अरून पाठक, अशोक हजारे,, एम.पी.राव, हॅंडसन राव, माधव बांगडे, निशांत देवगडे, आकाश वानखेडे, शुभम चांभारे, अफजल भाई, किशोर गोवारदिपे, इम्रान शेख, संजय राय, मनोज आजनकर, श्रीपाद भाकरे, चेतन स्वान, अमर महाकुलकर, शिवा कवादार, तौसीफ शेख, मंगीलाल बनोत, शक्ती गौरकार, अश्विन कांबळे, निखिल जगताप, अमर सिंग, राहुल सातघरे, राकेश जुमडे, राकेश कुचेकार, शहबान शेख, राहुल आसुटकर, सतिश सातपुते, सॅमसन मानकर, दिलिप पोईनकर, सुनिल खारकर, संदीप पाचभाई, राकेश कुचेवार, मंगेश नागपूरे, पिंटू मरस्कोले, एजान पठान, नितिन बावने, योगेश वाळके, नितिन सारडा, राजु पवार, रमेश शुक्ला, वंदना सिन्हा उत्तर भारतीय महिला जिल्हा अध्यक्ष, ममता राजभार, उत्तर भारतीय महिला रोमा राजभार, प्रभा राजभार, इत्यादी भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी व महिला आघाडी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार साप्ताहिक वृत्तपत्र मालक , प्रकाशक , संपादक आशीष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टिसर्व्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.
A weekly newspaper `SAHYADRI CHA RAKHANDAR` printed by *Suraj Bhaktraj Ghume* ,sahyandri multiservices, karmveer ward , warora 442907 (M.H ) on behalf of Ashish Maroti Ghume owner, publisher & Editor of sahyadri cha rakhandar` matruchaya bhawan` , karmveer ward warora 442907(M.H) . the editer may not be agree with the published content . in case any objection , the content will be redressed under warora court RNI NO : MAHMAR/2018/77866
CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com EPAPER :- epaper.sahyandrinews.com